# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः11.11.2024** **वारःसोमवार**

1. विधानसभा निवडणुकीसाठी सत्ताधारी भाजपच्या संकल्पपत्राचं केंद्रीय गृहमंत्री आणि ज्येष्ठ भाजपा नेते अमित शाह यांच्या हस्ते प्रकाशन
2. महाविकास आघाडीच्या महाराष्ट्रनामा नावाच्या जाहीरनाम्याचं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रकाशन
3. 85 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी अनेक ठिकाणी गृहमतदान सुविधा उपलब्ध आणि
4. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात टीईटी काल राज्यात सर्वत्र सुरळीतपणे पार पडली.

**निवडणूक प्रचार सत्ताधारी-मुंबई**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीच्या मतदानाचा दिवस जवळ येत असल्यानं राजकीय पक्षांच्या प्रचारानं वेग घेतला आहे. केंद्रीय गृहमंत्री आणि ज्येष्ठ भाजपा नेते अमित शाह यांनी काल मुंबईत भाजपाच्या संकल्पपत्राचं प्रकाशन केलं. समाजाच्या सर्व घटकांचा विचार करून तयार केलेलं हे संकल्प पत्र राज्याच्या जनतेचं आकांक्षा पत्र आहे. यातून महाराष्ट्राला मजबूत, समृद्ध आणि सुरक्षित राज्य बनवू, असा विश्वास अमित शाह यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

**निवडणूक विरोधक- मुंबई**

विधानसभा निवडणुकीसाठी राज्यातल्या महाविकास आघाडीचा जाहीरनामा काल मुंबईत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रसिद्ध करण्यात आला. महाराष्ट्रनामा असं त्याला नाव देण्यात आलं आहे. महाविकास आघाडीचं सरकार सत्तेत आल्यानंतर पहिल्या 100 दिवसात काय करणार याचा तपशील यावेळी देण्यात आला. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात, खासदार वर्षा गायकवाड यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते उपस्थित होते.

**गडकरी- यवतमाळ**

भाजप घटना बदलणार असल्याचा विषारी प्रचार काँग्रेस करत आहे मात्र लोकतंत्र, समाजवाद, धर्मनिरपेक्षता ही घटनेची मूलभूत तत्वे कुणीही बदलू शकत नाही. उलट स्वतःच्या सोयीकरिता काँग्रेसनंच आतापर्यंत घटनेचा दुरुपयोग केला असल्याचा आरोप केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केला. यवतमाळच्या राळेगाव इथं काल भाजप उमेदवार अशोक उईके याच्या प्रचारसभेत ते बोलत होते. काँग्रेस मुसलमानांची देखील खोट्या प्रचारातून दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत असून जातीयवादी आणि सांप्रदायिक प्रचारापासून दूर राहा असं आवाहनही गडकरी यांनी केलं.

**राज ठाकरे-पुणे**

गेल्या पाच वर्षातील राजकारण आणि नेतेमंडळींचं वागणं पाहता मतं एकाच्या नावानं मागायची आणि सत्ता वाटेल त्या पद्धतीनं उपभोगायची, अशी स्थिती सध्या आहे असं मत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केलं. ते काल पुण्यात कसबा मतदारसंघातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार गणेश भोकरे यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत बोलत होते.

**<u>छत्रपती संभाजी राजे-नवीमुंबई</u>**

महाराष्ट्रातील गढूळ वातावरण स्वच्छ करण्यासाठी स्वराज्य पक्ष निवडणूक लढवत असल्याचं पक्षप्रमुख छत्रपती संभाजीराजे काल नवी मुंबई इथं सांगितलं. परिवर्तन महाशक्तीच्या वतीनं स्वराज्य पक्षाचे उमेदवार अंकुश कदम यांच्या प्रचारार्थ कोपरखैरणे विभागात प्रचार फेरी काढण्यात आली होती. त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते.

**<u>उध्दव ठाकरे-परभणी</u>**

महाराष्ट्राची अधोगती आणि गुजरातची प्रगती म्हणजे महायुती असल्याची टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. ते काल परभणी मतदार संघाचे आघाडीचे उमेदवार डॉ राहुल पाटील आणि गंगाखेड मतदार संघाचे उमेदवार विशाल कदम यांच्या प्रचार सभेत बोलत होते.

**<u>बागवे</u>**

पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश बागवे यांना सर्वाधिक मताधिक्य देऊन विजयी करण्याचा निर्धार विविध पक्ष संघटनांमध्ये कार्यरत असलेल्या आंबेडकरी कार्यकर्त्यांकडून काल करण्यात आला. रिपब्लिकन युवा मोर्चा आणि महाविकास आघाडी यांच्यावतीनं आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात हा निर्णय घेण्यात आल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयदेव गायकवाड यांनी सांगितलं.

**<u>वारकरी</u>**

राष्ट्रवादी आध्यात्मिक आणि वारकरी आघाडी संपूर्ण महाराष्ट्रभर भजन, कीर्तन आणि प्रवचनाच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा प्रचार करणार आहे. या प्रचार वारीची सुरुवात शनिवारी पुण्यातील पत्रकार भवन इथून झाली.

**<u>गुन्हा-कोल्हापूर</u>**

कोल्हापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात प्रचार सभेमध्ये आक्षेपार्ह विधान केल्याबद्दल भाजपाचे खासदार धनंजय महाडीक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

**<u>अभिनेते मकरंद अनासपुरे-मतदार आवाहन</u>**

येत्या 20 तारखेला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी केलं आहे......

**<u>ईट राइट स्थानक</u>**

पुणे विभागातील पुण्यासह 10 रेल्वे स्थानकांना ईट राइट स्थानक मानांकन मिळालं आहे. अन्न तयार करण्यापासून ते प्रवाशांना खाण्यासाठी देण्यापर्यंतची प्रक्रिया प्रमाणित पद्धतीनं करण्याचं प्रशिक्षण या स्थानकांतील सर्व खाद्य विक्रेत्यांना देण्यात आलं आहे. त्याविषयीचा हा वृत्तांत...

**प्रवासाला जातानं घरचंच पौष्टिक, आरोग्यदायी अन्न सोबत घेण्याची भारतीय परंपरा आहे. विशेषतः रेल्वे प्रवासात. कारण प्रवास लांबचा असतो आणि वाटेत काय खायला मिळेल ते कसं असेल असा विचार असतो. हीच गरज आणि भावना विचारात घेऊन भारतीय रेल्वेनं संपूर्ण देशवासियांनीच योग्य ते अन्न खावं म्हणजेच इट राईट इंडिया या पुढाकारातून रेल्वे स्थानकांना इट राइट स्थानक मानांकन देण्यास सुरुवात केली आहे. या स्थानकांवर बनवलं जाणाऱ्या अन्नाची संपूर्ण प्रक्रिया प्रशिक्षणासह प्रमाणित करण्यात आली आहे. भारतीय अन्न सुरक्षितता आणि मानक प्राधिकरणाचं प्रमाणपत्र यासाठी देण्यात येतं, तत्पूर्वी त्रयस्थ संस्थेमार्फतही या प्रमाणित अन्नाची शहानिशा केली जाते. पुणे विभागातील रेल्वेच्या पुणे, कोल्हापूर, मिरज, सांगली, सातारा, दौंड, अहमदनगर, शिर्डी, शिवाजीनगर आणि कोपरगांव या स्थानकाना हे मानांकन मिळालं आहे. अगदी घरच्यासारखं आपल्या हातचं नाही पण ते सर्वांना खाण्यासाठी राइट असावं अशी ही सोय कायम राहावी आणि ही संकल्पना खाद्यपदार्थांच्या सर्वच विक्रेत्यांना लागू व्हावी अशी अपेक्षा करायला हरकत नाही. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.**

**गृहमतदान-सांगली**

भारत निवडणूक आयोगानं 85 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यासाठी सांगली जिल्ह्यात नोंदणी करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या घरी जावून गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली देत आहे. याबद्दल ज्येष्ठ नागरिकांनी भारत निवडणूक आयोग आणि निवडणूक यंत्रणेचे आभार मानले आहेत. वाहतूक शाखा सांगलीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुकुंद कुलकर्णी यांच्या 91 वर्षांच्या मातोश्री मंगला कुलकर्णी यांनी गृह मतदान सुविधेव्दारे मतदान केलं. तर नेमिनाथनगर इथल्या 86 वर्षांच्या ज्येष्ठ नागरिक विद्या करमरकर, मिरज तालुक्यातील भोसे इथल्या 100 वर्षे वयाच्या चंपाबाई मगदूम, तसंच 85 वर्षांच्या सोनाबाई पवार यांनीही गृह मतदान केलं. त्याचबरोबर प्रतिबंधात्मक स्थानबद्ध असणाऱ्या मिरज विधानसभा मतदारसंघातील सांगली जिल्हा करागृहातही मतदान घेण्यात आलं.

**गृह मतदान**

ठाणे जिल्ह्यातील 18 विधानसभा मतदारसंघातून गृहमतदानासाठी एकंदर 933 जणांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी 8 आणि 9 नोव्हेंबर या दोन दिवसात 85 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदार मिळून 202 मतदारांनी गृहमतदानाचा हक्क बजावला आहे.

**गृह मतदान-वाशिम**

वाशिम जिल्ह्यातील तिन्ही विधानसभा मतदारसंघांमध्ये दिव्यांग आणि 85 वर्षांच्या वरील ज्येष्ठ नागरिकांच्या घरी जाऊन मतदान घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. गृह मतदान अंतर्गत रिसोड विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक म्हणजेच 546 मतदार तर सर्वात कमी 432 मतदार वाशिम विधानसभा मतदारसंघात आहेत. तर कारंजा विधानसभा मतदारसंघात 479 मतदार आहेत. गेल्या दोन दिवसात एकंदर 1 हजार 381 मतदारांनी गृहमतदान केलं आहे.

**मतदार जनजागृती- रत्नागिरी**

रत्नागिरी विधानसभा मतदारसंघामध्ये मतदार जनजागृती करण्यासाठी काल रत्नागिरी शहरात मॅरॅथॉन आयोजित करण्यात आली होती. भाट्ये समुद्रकिनाऱ्यावर या मॅरॅथॉनची सांगता झाली. विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी सर्व नागरिकांनी ब्रँड अँबेसेडर म्हणून काम करावं, असं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं. या वेळी स्वाक्षरी मोहिमेची सुरुवात करून, सर्वांनी मतदानाची शपथ घेतली.

**टीईटी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत आयोजित शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात टीईटी काल राज्यात सर्वत्र सुरळीतपणे पार पडली. राज्यातल्या 37 जिल्ह्यांमधील एक हजार तेवीस परीक्षा केंद्रांवर नियोजित वेळेत ही परीक्षा झाली. एकंदर 3 लाख 29 हजार 346 परिक्षार्थी उपस्थित होते असं महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेनं पत्रकाद्वारे कळवलं आहे.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र सूर्यप्रकाशयुक्त कोरडं हवामान राहील असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.